THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 18TH JULY 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २ माहे एप्रिल सन १८९५.

**नंबर २६५३.**—हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असेः—

**"फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.**

**सेपरेट रेव्हिन्यू.**

स्टांप.

मुक्काम कलकत्ता, तारीख २९ माहे मार्च सन १८९५.

नंबर १४९४.—एस्. आर.—सन १८७० चा कोर्टाचे फीचा (७ वा) आक्ट, कलम २६, ह्यावरून दिलेला अधिकार चालवून, आणि ह्या खात्याचा जाहिरनामा * नंबर ३६१, तारीख १८ माहे एप्रिल सन १८८३, ह्याच्या पहिल्या पारिग्राफाच्या ज्या भागांत, सदहू आक्टाअन्वयें ध्यावयाची फी कोणत्याही बाबतींत १० रुपयांपेक्षां कमी असेल तेव्हां ती फी दर्शविण्याच्या कारणासाठीं त्या जाहिरनाम्याच्या तारिखेस उपयोगांत असलेले व ज्यांवर "कोर्ट फी" असे शब्द आहेत असे चिकटणारे स्टांप वापरण्याविषयीं अधिकार दिलेला आहे तो भाग रद्द करून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावीत आहेत कीं, तारीख १ माहे जुलई सन १८९५ पासून, अशा बाबतींत चिकटणारे स्टांप वापरावयाचे ते, ज्यांवर "कोर्ट फी" असे शब्द असून ज्यांच्या मध्यभागीं तीन ओळी असतात व ज्यांच्या डाव्या बाजूस राणीचा मुखवटा व स्टांपाची किंमत दाखल केलेली असते, असे, सन १८८३ सालीं सुरू केलेल्या आकाराचे व नमुन्याचे स्टांप वापरले पाहिजेत.

* तारीख १७ मे १८८३ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, ह्याच्या ३५१-व्या पृष्ठावर पुनः प्रसिद्ध केलेला.

(सही) **स्टीफन जेकब,**

**आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."**

**आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल**

ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) **जे. न्यूजंट,**

**चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.**

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.